<><><><><>

धार्मिक मिरवणुकांदरम्यान होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीबाबत राज्य सरकारने त्वरित स्पष्टीकरण द्यावी अशी मागणी बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीने केली आहे.संभ्रम टाळण्यासाठी स्पष्ट आणि एकसमान लेखी मार्गदर्शक तत्त्वं आवश्यक असल्याचं समितीनं म्हटलं आहे.

<><><><><>

मुंबईत गिरगाव चौपाटी इथं उद्या गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेनं विसर्जनासाठी आवश्यक सर्व व्यवस्था केली आहे. या परिसरात कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवली तर संबंधित यंत्रणांमध्ये त्वरित समन्वय साधता यावा यासाठी महानगरपालिकेनं प्रथमच व्यापक स्वरुपावर ‘आपत्ती व्यवस्थापन कक्ष’ कार्यरत केलं आहे.

पुण्यात गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनानं विशेष नियोजन केलं आहे. महापालिकेनं रुग्णवाहिका आणि वैद्यकीय पथकं सज्ज ठेवली आहेत. नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचं पालन करून गणेशोत्सव शांततेत आणि सुरक्षितपणे साजरा करावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.

नागपूरमधे तब्बल १ हजार ७०२ सार्वजनिक आणि २ लाख ४ हजार घरगुती गणपतींचं विसर्जन होणार आहे. विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, नागरिकांना वाहतुकीचा आणि गर्दीचा त्रास होऊ नये, यासाठी शहरात कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली असून, वाहतूक आणि गर्दीचं नियोजन केलं आहे.

नाशिक जिल्ह्यात लेझर लाईटला बंदी असून विसर्जन मिरवणुकीतल्या प्रत्येक मंडळाला डेसीबल मोजण्यासाठी मीटर लावावं लागणार आहे. नाशिक पोलीसांनी आज गणेशोत्सव महामंडळाची बैठक घेऊन त्यांना याबाबत सूचना दिल्या. नाशिक शहरात यंदा गोदावरी, वालदेवी, नंदिनी नदीकाठी ७७ अधिकृत विसर्जन स्थळे निश्चीत केली आहेत.

<><><><><>

वित्तीय क्षेत्रातल्या कंपन्या, धातू, वाहन उद्योग आणि तेल कंपन्यांच्या समभागात जोरदार घसरण झाल्यानं आज सेन्सेक्स सुमारे साडे बाराशे अंकांनी कोसळला तर निफ्टीमध्ये पावणे ४०० हून अधिक अंकांची घसरण झाली. म्युच्युअल फंड व्यवस्थापन

